आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबर पासून सुरु होणार
- वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारत सारख्या गाड्या भारतीय रेल्वेच्या भवितव्याचा पाया घालत आहेत, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- पुणे जमीन घोटाळ्यात कोणत्याही दोषीला सोडलं जाणार नाही, अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- कोल्हापूरमधे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी एकत्रितपणे लढणार

**आणि**

- बुद्धिबळपटू राहुल व्ही एस ठरला भारताचा ९१ वा ग्रँडमास्टर

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात लोकशाही बळकट करणं आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं विधायक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी इथं चार वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. यात वाराणसी-खजुराहो, लखनौ-सहारानपूर, फिरोजपूर-दिल्ली, आणि एर्नाकुलम-बंगळुरू या गाड्यांचा समावेश आहे. यामुळे वंदे भारत गाड्यांची संख्या आता १६० झाली आहे.

विकसनशील देशांमधल्या पायाभूत सुविधांचा विकास हा त्या देशाच्या आर्थिक विकासात भर टाकत असतो. रेल्वे आणि रस्ते बनतात तेव्हा विकासाला चालना मिळते,

आज भारत देखील विकासाच्या मार्गावर वेगानं जात आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं.

**- - होल्ड बाईट मोदी रेल्वे - -**

वंदे भारत, नमो भारत आणि अमृत भारत सारख्या गाड्या भारतीय रेल्वेच्या भवितव्याचा पाया घालत आहेत, वंदे भारत ही भारतीयांकडून भारतीयांसाठी चालवली जाणारी गाडी असून प्रत्येक नागरिकाला याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

यावेळी उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव उपस्थित होते.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या प्रचाराचा उद्या शेवटचा दिवस असल्यामुळे प्रचाराला वेग आला आहे. रालोआ आणि महाआघाडीचे वरिष्ठ नेते आणि स्टार प्रचारकांनी सभा आणि बैठकांचा धडाका लावला आहे. पहिल्या टप्प्यातल्या मतदानात बिहारच्या जनतेनं राओलाचा विजय निश्चित केला आहे, असा विश्वास भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. ते आज सितामढी इथं प्रचारसभेला संबोधित करत होते.

**महाआघाडी**च्या उमेदवारांच्या प्रचारासाठी कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्या प्रियांका गांधी, राजद नेते तेजस्वी यादव यांच्या प्रचारसभा होत आहेत.

पहिल्या टप्प्यात महाआघाडी ७२ जागांवर विजयी होईल, असा विश्वास कॉंग्रेस नेता पवन खेडा यांनी आज पाटणा इथं वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला. रालोआच्या घटक पक्षांमधे समन्वयाचा अभाव असल्याचंही ते म्हणाले.

**दुसऱ्या** टप्प्यातल्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर भारत-नेपाळ सीमा उद्या सकाळपासून ११ नोव्हेंबरपर्यंत पूर्णपणे बंद राहील. या परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. या काळात मधुबनी जिल्ह्यातील जयनगर ते नेपाळमधील जनकपूरपर्यंत रेल्वे सेवा देखील बंद ठेवण्यात येणार आहे.

**दरम्यान,** पहिल्या टप्प्यात ६४ पूर्णांक ६६ दशांश टक्के मतदान झालं. दुसऱ्या टप्प्यातलं मतदान ११ नोव्हेंबरला होणार असून १४ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज  अंगोला आणि बोत्सवाना या 2 देशांच्या दौऱ्यावर रवाना झाल्या. भेटीच्या पहिल्या टप्प्यात त्या अंगोलाच्या अध्यक्षांच्या निमंत्रणावरून अंगोला देशाला भेट देतील. अंगोलाच्या 50 व्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमातही त्या सहभागी होतील. तिथल्या भारतीय समुदायाशीही त्या संवाद साधणार आहेत. त्यानंतर 11 नोव्हेंबरला त्या बोत्सवानाला जातील. त्या बोत्स्वानाच्या अध्यक्षांबरोबर द्विपक्षीय चर्चा करतील. तसंच तिथल्या संसदेला संबोधित करतील.

<><><><><>

आर्थिक वाढीच्या दराबाबत जागतिक बँकेनं भारताचं कौतुक केलं आहे. जागतिक दर्जाची डिजीटल सेवा हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मजबूत पाया असल्याचं जागतिक बँकेने म्हटलं आहे. तंत्रज्ञानातली क्षमता आणि उत्पादकतेत सुधारणा झाल्याचंही जागतिक बँकेनं म्हटलं आहे. यापुढेही  आर्थिक विकास अधिक वेगानं होण्यासाठी  आर्थिक व्यवस्थापन आणखी मजबूत करायला हवं. आर्थिक क्षेत्रांमधे सुधारणा आणि खाजगी गुंतवणुकीवर भर द्यावा लागेल, असं निरीक्षणही जागतिक बँकेने नोंदविलं आहे.

<><><><><>

पुणे जमीन घोटाळ्यात कोणत्याही दोषीला सोडलं जाणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. नागपूर इथे ते काल वार्ताहरांशी बोलत होते. या प्रकरणात अनियमितता झाल्याचंही स्पष्ट झालं असून अतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. प्रकरणाची व्याप्ती आणि  संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल असं ते म्हणाले. प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे आणि या संपूर्ण व्यवहारात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

गडचिरोलीचा उल्लेख महाराष्ट्राचं प्रवेशद्वार म्हणून होण्यासाठी शेवटच्या गावापर्यंत विकास पोहोचवण्याकरता  राज्यसरकार प्रयत्नशील आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा इथं  रुबी हॉस्पीटल अँड वेलनेस रुग्णालय  आणि महाविद्यालय संकुलाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते

बोलत होते. प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण आरोग्याचा अधिकार असून गडचिरोली सारख्या भागात देखील आरोग्यसेवा पोहोचत आहेत, जिल्ह्याचं चित्र बदलत आहे, असं ते म्हणाले. राज्य सरकारनं नुकतीच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली आहे, गडचिरोली जिल्ह्यासाठी राज्य सरकारनं पाचशे कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या कामाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे दळणवळणाच्या दृष्टीनं पायाभूत सुविधा वाढवल्या जात आहेत. गडचिरोली हा जिल्हा देशाचं स्टील हब आहे. इथं पाच कोटी झाडं लावून वृक्ष आच्छादन वाढवायचं आहे, जल, जमीन आणि संवर्धन करुन विकास साधण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

कोल्हापूरमधे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणूनच लढणार असल्याचं आघाडीच्या नेत्यांनी जाहीर केलं. कोल्हापूरमधे काल महाविकास आघाडीची बैठक झाली, त्यावेळी हा निर्णय झाला. काँग्रेस नेते सतेज पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते विनायक राऊत आणि सुनील प्रभू, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे व्ही बी पाटील यावेळी उपस्थित होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजु शेट्टी यांच्याशीही लवकरच चर्चा करणार असल्याचं सतेज पाटील यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रापा म्हणजेच रेडिओ अँड टेलिव्हिजन प्रोफेशनल्स असोसिएशन ट्रस्ट या संस्थेतर्फे रेडिओ आणि टीव्ही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना १८ विविध विभागांमधले पुरस्कार काल प्रदान करण्यात आले. चित्रपट निर्माते किरण शांताराम, ऑस्कर अकादमीच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषदेचे सदस्य उज्ज्वल निरगुडकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी, लोकसेवेचा संदेश या विभागात आकाशवाणीच्या कार्यक्रम अधिकारी नेहा खरे यांचा, तर रेडिओ जिंगल या प्रकारात उद्घोषक दिनेश अडावदकर यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

तर दूरदर्शन सह्याद्रीला सर्वोत्तम मराठी यूट्यूब वाहिनी हा पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

<><><><><>

बुद्धिबळपटू  राहुल व्ही एस याला भारताचा ९१ वा ग्रँडमास्टर होण्याचा मान मिळाला आहे. सहावी आसियान वैयक्तिक अजिंक्यपद  बुद्धिबळ स्पर्धा जिंकल्यानं फिडे अर्थात जागतिक बुद्धिबळ महासंघानं राहुलला ग्रँडमास्टर हा किताब दिला आहे. आठवड्यापूर्वीच चेन्नई मधला इलमपथी ए आर भारताचा ९० वा ग्रँडमास्टर बनला तर त्याआधी एस रोहित कृष्णाला देखील हा किताब मिळाला. बुद्धिबळ क्रमवारीत ग्रँडमास्टर ही  सर्वोच्च पदवी आहे.

<><><><><>

२०२९मध्ये होणाऱ्या महिला एकदिवसीय विश्वचषकातल्या सहभागी संघांची संख्या ८वरून १०वर न्यायचा निर्णय आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं घेतला आहे. अलीकडे या स्पर्धेला मिळालेल्या यशामुळे हा निर्णय घेतल्याचं आयसीसीनं निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

भारत-ऑस्ट्रेलिया टी २० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज ब्रिस्बेनमधे होत आहे. नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाच्या संघानं प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

भारत या मालिकेत २-१ अशा गुणफरकाने आघाडीवर आहे.

<><><><><>

नशेचं इंजेक्शन विकणाऱ्या एका तरुणाला अलिबाग पोलिसांनी सापळा रचून अटक केली. यावेळी त्याच्याकडून इंजेक्शनच्या दहा बाटल्या आणि काही रोकड रक्कम जप्त केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आक्षी साखर इथल्या कोळीवाडा परिसरात सूरज मनोज राणे हा तरुण मेफेन्टर माईन सल्फेट हे गुंगीकारक इंजेक्शन बेकायदेशीररीत्या विकत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली.

//<><><><><>//